जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय बीड

जिल्हाधिकारी तथा, जिल्हादंडाधिकारी बीड यांचे कार्यालय (गृह विभाग)
नगर रोड, बीड. ४३११२२
दुरध्वनी क्रं. ०२४४२-२२२६०४ फॅक्स ०२४४२-२२२०११

क्र.२०२०/आरबीडेस्क-१/पोल-१/कावि-फौप्रसंक१४४ दिनांक ०४/०४/२०२०.

**संदर्भ:-** १. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४

**आदेश:-**

ज्याअर्थी, एक सप्ताहापूर्वी मरकज मशीद निजामुद्दीन दिल्ली येथील घटनेनंतर सोशल मिडीया व्हाटसअप ग्रुप (Whatsapp Group) वर विविध प्रकारचे सांप्रदायिक भडकाऊ मेसेज/संदेश हे हिंदु/मुस्लीम ग्रुप मध्ये प्रस्तारीत होत असल्यामुळे जिल्हयामध्ये सांप्रदायिक घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पोलीस विभागातर्फे अशा प्राप्त होणाऱ्या मेसेज/संदेश वर गुन्हे दाखल करुन आरोपी विरुध्द कार्यवाही करण्यात आली आहे.

ज्याअर्थी,असे निर्दशनास आले आहे की, जातीय स्वरुपाचे व्हाटस ग्रुपवर (Whatsapp Group) धार्मिक/सांप्रदायिक तेढ निर्माण करणारी मेसेज/संदेश पाठविली जातात. त्यामुळे जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु शकतो.

ज्याअर्थी, जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशा उपाययोजना करणेकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३)अन्वये बीड जिल्हयात व्हाटस ग्रुपचे ॲडमीन(Whatsapp Group) यांना उद्येशुन आदेश काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी राहुल रेखावार जिल्हाधिकारी,बीड फौजदारी प्रकिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार दिनांक ०४/०४/२०२० रोजी पासुन बीड जिल्हयात पुढील प्रमाणे आदेश लागू करीत आहे.

१.बीड जिल्हयातील व्हाटसअप ग्रुपचे (Whatsapp Group)ॲडमीन हे त्यांच्या व्हाटसअप ग्रुपवर (Whatsapp Group) फक्त ॲडमीन हेच मेसेज/संदेश पाठवु शकतील.

२.व्हाटसअप ग्रुपचा (Whatsapp Group) इतर कोणाताही सदस्य व्हॉटसअप ग्रुपवर (Whatsapp Group)मेसेज/संदेश पाठवु शकणार नाही.

३.यानंतर जर कोणी व्हाटसअप ग्रुपवर (Whatsapp Group) कोणीही धर्म/धर्मगुरु/धार्मिकस्थळाबाबत मेसेज/संदेश किंवा असा कोणताही संदेश ज्यामुळे समाजांमध्ये/धर्मांमध्ये तेढ निर्माण होवु शकेल असे मेसेज/संदेश प्रसारीत करतील अशा व्हाटसअप ग्रुपचे (Whatsapp Group)ॲडमीन हे गुन्हयास पात्र ठरतील. याबाबत त्यांची वैयक्तीक जबाबदारी राहील.

४. सदरील आदेश हे पुर्णपणे प्रशासकीय कामकाजा करीता उपयोगता आणल्या जाणाऱ्या व्हाटसअप ग्रुपला(Whatsapp Group) लागू राहणार नाहीत.

सदर चे आदेश आज दिनांक ०४/०४/२०२० रोजी सही शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरीत/-
(राहूल रेखावार)
जिल्हाधिकार तथा जिल्हादंडाधिकारी
बीड

**प्रत:**

१. मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग (विशेष) महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. पोलीस अधिक्षक बीड यांना माहिती व कार्यवाहीस्तव. .

४. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड.

Scanned with CamScanner

५. अधिष्ठाता, स्वामी रामानंद तिर्थ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

६. जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

८. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

९. उपविभागीय दंडाधिकारी बीड, पाटोदा, माजलगांव, परळी, अंबाजोगाई.

१०. कार्यकारी दंडाधिकारी (सर्व) जिल्हा बीड.

११. सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

१२. विभाग नियंत्रक, रा.प.म. बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

१३. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

१४. जिल्हा प्रशासन अधिकारी (नगर पालिका प्रशासन विभाग) जि.का.बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

१५. जिल्हा माहिती अधिकारी बीड यांना माहितीस्तव व स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेसाठी.

04/04/20

**जिल्हादंडाधिकारी बीड**

Scanned with CamScanner